**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

प्रा.दिनेश श्रीपती सूर्यवंशी
भौतिकशास्त्र विभाग,
सर परशुरामभाऊ महाविद्यालय,
पुणे-३० **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षण प्रसारक मंडळी,
पुणे-३० **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** प्राचार्य,
सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे-३०

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०२७/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०८.०४.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** - प्रा.दिनेश श्रीपती सूर्यवंशी<br>भौतिकशास्त्र विभाग,<br>सर परशुरामभाऊ महाविद्यालय,<br>पुणे-३०<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षण प्रसारक मंडळी,<br>पुणे-३० डॉ.गं.का.शिरुडे<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** प्राचार्य,<br>सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे-३० डॉ.दिलीप ना.शेठ | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.०९.२००९ |
| ५ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या मागणीनुसार कोणतीही माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता प्रा.दिनेश श्रीपती सूर्यवंशी यांनी केली.

आपण नव्याने प्राचार्यपदाची सूत्रे घेतली असून देय माहिती आठ दिवसांत दिली जाईल. असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे-३० डॉ.दिलीप ना.शेठ यांनी केले. अपीलकर्त्यानी ते मान्य केले. मात्र त्यानुसार माहिती न दिल्याबद्दल त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता प्रा.सूर्यवंशी यांनी दि.२०.०४.२०१० च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. अपीलकर्ता श्री.सूर्यवंशी यांनी माहिती-मागणी अर्जात भाष्य करुन खुलासे, कारणे अशा स्वरुपाची विचारणा केली आहे. तसेच त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दे आणि प्रथम व आयोगाकडील अपिलातील मुद्दे यांत तफावत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मध्ये खुलासा, भाष्य, अन्वयार्थ, अभिप्राय यांची मागणी 'माहिती' म्हणून करता येत नाही. तसेच मूळ अर्जाव्यतिरिक्तचे मुद्दे अपिलात ग्राह्य नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अमान्य करण्यात येत आहे.
२. प्रा.संजीव जगताप व प्रा.अशोक गडधरे यांची सेवाजेष्ठता व त्यांना महाविद्यालयाने प्रदान केलेले अधिकार याबाबतची माहिती अपीलकर्त्यास अपेक्षित असल्याचे मूळ अर्जावरुन दिसते. ही माहिती जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे डॉ.दिलीप ना.शेठ यांनी अपीलकर्त्यास देऊन अनुपालन अहवाल दि. २०.०६.२०१० पर्यंत आयोगास सादर करावा.

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गणपत पुंडलीक जाधव
मु.पो.माढा, मंगळवार पेठ, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्र),
जिल्हा परिषद, सोलापूर, जि.सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी सा.प्र.वि.-१,
जिल्हा परिषद, सोलापूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०२९ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्र),
जिल्हा परिषद, सोलापूर, जि.सोलापूर श्री.व्ही.एस.मुळीक

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी सा.प्र.वि.-१,
जिल्हा परिषद, सोलापूर, जि.सोलापूर श्री.आर.बी.महिंगडे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२५.६.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२९.७.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.४.९.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२९.९.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

एका कर्मचाऱ्याच्या संदर्भात आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी सा.प्र.वि.-१, जिल्हा परिषद, सोलापूर, जि.सोलापूर यांनी दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्र), जिल्हा परिषद, सोलापूर, जि.सोलापूर यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी सा.प्र.वि.-१, जिल्हा परिषद, सोलापूर, जि.सोलापूर यांनी पूर्तता केली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.गणपत पुंडलीक जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री.जाधव यांनी नियमबाह्य पध्दतीने जिल्हा निवड मंडळाशिवाय जिल्हा परिषद सेवेत प्रवेश मिळविला. या संदर्भात औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयानंतर दिलेली नेमणूक सलग धरण्याची मागणी श्री.जाधव यांनी केली होती. कक्ष अधिकारी श्री.आर.बी.महिंगडे, अधीक्षक श्री.एस.एम.गवळी व वरिष्ठ सहाय्यक श्री.आर.पी.देशपांडे यांनी सलग सेवा करता येत नसल्याचा अभिप्राय दिल्यामुळे श्री.जाधव सातत्याने त्यांच्याविरूध्द व्यक्तिगत अर्ज व तक्रारी करीत आले आहेत. डिसेंबर २००७ पासून जुलै २००९ पर्यंत त्यांनी या कर्मचाऱ्यांबाबतची माहिती मागणारे २४ अर्ज व त्या संदर्भात १६ अपिले केली आहेत. सदरच्या कर्मचाऱ्यांना नाहक मानसिक त्रास देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यातूनच श्री.एस.एम.गवळी दि.२५.११.२००९ रोजी मृत्यू पावले. स्वत:चे वैयक्तिक काम करून घेण्यासाठी दबावाचे साधन म्हणून श्री.जाधव माहितीच्या अधिकाराचा दुरूपयोग करीत आहेत, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्र), जिल्हा परिषद, सोलापूर, जि.सोलापूर श्री.व्ही.एस.मुळीक यांनी केले.

माहितीच्या अधिकाराच्या दुरूपयोगातून मानसिक त्रास झाल्यामुळे एखाद्या कर्मचाऱ्याचे निधन झाल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्र), जिल्हा परिषद,



(१०)

सोलापूर, जि.सोलापूर यांचे म्हणणे असल्यास त्याबाबत रितसर कायदेशीर कारवाईचा मार्ग त्यांना व अन्य संबंधितांना उपलब्ध आहे. मात्र विशिष्ट कर्मचाऱ्यांबाबत सातत्याने त्याच त्याच स्वरूपाची माहिती मागण्याची अपीलकर्ता श्री.गणपत पुंडलीक जाधव यांची कृती योग्य नाही. अशा प्रकारे सर्व यंत्रणांचा वेळ व कार्यशक्ती याचा अपव्यय करू नये, अशी समज अपीलकर्ता श्री.गणपत पुंडलीक जाधव यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

पुणे
28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दादासाहेब लक्ष्मण जगताप
मु.पो.कालठण नं.१, ता.इंदापूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कालठण,
ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०३० / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.एस.व्ही.भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कालठण,
ता.इंदापूर, जि.पुणे श्री.जी.व्ही.जगताप

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२१.८.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३.१०.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.दादासाहेब लक्ष्मण जगताप यांनी मागितलेली माहिती घेऊन जाण्याबाबत वारंवार कळवूनही नेली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कालठण, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.जी.व्ही.जगताप यांनी केले. आपल्याला समक्ष माहिती मिळाली असून समाधान झाले आहे व अपील मागे घेत आहे, असे अपीलकर्त्यांने अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे यांना दिलेले लेखी निवेदन अपिलीय प्राधिकारी श्री.एस.व्ही.भोसले यांनी सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

ॲड. दिपक भूपाल माने
मेन रोड कुपवाड, ता. मिरज, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०३३ / २००९ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | ६.४.२००९ |

३. **उपस्थित**
**अपीलकर्ता** - ॲड. दिपक भूपाल माने
मेन रोड कुपवाड, ता. मिरज, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली श्रीमती अश्विनी मुदगाड

**जन माहिती अधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली श्री. एम. आर. पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.८.२००९, ६.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.१२.२००९ |

८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

शासकीय परीक्षेतील काही उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची प्रत जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी नाकारली. या मागणीत व्यापक जनहित आहे. संबंधित परीक्षेतील गैरप्रकाराबाबत वृत्तपत्रांमध्ये बातम्या प्रसिध्द झाल्या होत्या. संपूर्ण माहिती उघड झाल्यावर त्यातील व्यापक जनहित स्पष्ट होईल, असे प्रतिपादन अपीलकर्ता अॅड. दिपक भूपाल माने यांनी केले.

अॅड. माने यांनी परीक्षाविषयक माहिती मागितली असल्याने त्याबाबत शासनाचे मार्गदर्शन मागितले होते व त्यानुसार संबंधित उमेदवाराने मागणी केल्यास त्याच्या उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती देता येतील, असे कळविले, असे जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली श्री. एम. आर. पाटील यांनी नमूद केले.

अन्य उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांच्या प्रतींची सरसकट मागणी अपीलकर्त्याने करणे योग्य नाही. तथापि शासकीय नियुक्त्यांमधून परीक्षा प्रकिया पूर्णपणे पारदर्शक असणे आवश्यक आहे, हे लक्षात घेता सर्व उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांच्या प्रती कोणालाही उपलब्ध असणे रास्त ठरते. प्रस्तुत प्रकरणी अॅड. माने यांनी केलेल्या मागणीनुसार उत्तरपत्रिकांच्या प्रतींसह सर्व माहिती (कारणे, खुलासा या स्वरूपाच्या विचारणेबाबतची कारणे वगळून ) द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचे जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी दि. ७.४.२०१० च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 21 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्तात्रय गुंडा जाधव
भारतमातानगर प्लॉट नं.२७३, मु.पो.मजरेवाडी,
ता.उत्तर सोलापूर, होडगी रोड, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, अक्कलकोट, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, अक्कलकोट, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०३४ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दत्तात्रय गुंडा जाधव
भारतमातानगर प्लॉट नं.२७३, मु.पो.मजरेवाडी, ता.उत्तर सोलापूर, होडगी रोड, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, अक्कलकोट, जि.सोलापूर श्री.प्रशांत ढगे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
अक्कलकोट, जि.सोलापूर श्री.एम.एम.बिराजदार

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१०.६.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२२.७.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२२.९.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.८.१२.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सन १९६२ मधील एका जमीन प्रकरणातील हुकूमनाम्याची सहीशिक्क्याची नक्कल आपण मागितली असता अभिलेख उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर यांच्या पातळीवरून कळविण्यात आले. ही माहिती आपल्याला मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.दत्तात्रय गुंडा जाधव यांनी केली.

सन १९६२ मधील हे अभिलेख आहेत. त्या संदर्भातील फेरफाराची नक्कल आहे. अभिलेख कक्षामध्ये जुन्या कागदपत्रांचे गठ्ठे तपासून पाहूनही ४७ वर्षांपूर्वीची ही माहिती मिळाली नाही. त्यामुळे तसे श्री.जाधव यांना कळविले. त्यावेळचे अव्वल कारकून यांना बोलावून घेऊनही शोध घेतला, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर श्री.एम.एम.बिराजदार व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर श्री.प्रशांत ढगे यांनी केले.

मूळ कागदपत्रांच्या उपलब्धतेबाबतची अडचण लक्षात घेता, संबंधित अभिलेखाचे अवलोकन अपीलकर्त्यास नि:शुल्क करू द्यावे व अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास त्यातील कागदपत्रांच्या प्रती नि:शुल्क द्याव्या, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**28 MAY 2010**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शंकर भागवत गात
मु.पो.जामगाव (आ), लातूर रोड, ता.बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, श्रीराम विद्यालय व
ज्युनिअर कॉलेज, धोत्रे, पो.खामगाव, ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०४५ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शंकर भागवत गात
मु.पो.जामगाव (आ), लातूर रोड, ता.बार्शी, जि.सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, श्रीराम विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, धोत्रे,
पो.खामगाव, ता.बार्शी, जि.सोलापूर प्रतिनिधी श्री.सुनिल दादाराव जाधवर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.५.८.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१२.१०.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

श्रीराम विद्यालय व ज्युनिअर कॉलेज या संस्थेत शिपाई म्हणून आपल्याला नेमणूक दिली. पण प्रत्यक्षात आपण शिक्षकाचे काम करीत होतो. आपण बी.एस.सी., बी.एड. असून मुख्याध्यापकांनी सांगितल्यामुळे विविध कागदपत्रांवर त्यांच्या वतीने म्हणून आपण सह्या केल्या. संस्थेतील सेवेच्या अनुषंगाने आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्रीराम विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, धोत्रे, पो.खामगाव, ता.बार्शी, जि.सोलापूर यांनी दिली नाही. ते आमच्यानंतर संस्थेत दाखल झालेले आहेत. आपण अन्यायाविरुध्द लढत असल्यामुळे जाणूनबुजून अनेक आरोपांमध्ये आपल्याला गुंतविण्याचा प्रयत्न संस्था करीत आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.शंकर भागवत गात यांनी केले.

अपीलकर्ता श्री.शंकर भागवत गात व श्री.मनोज वासुदेव रेळेकर हे दोघे शाळेत शिपाई होते. लेखनिक, मुख्याध्यापक अशा विविध पदांचा उल्लेख करून अनेक कागदपत्रांवर त्यांनी सह्या केल्या. बनावट कागदपत्रांच्या आधारे उत्पन्नाचा खोटा दाखला त्यांनी तयार केला. संस्थेची कागदपत्रे चोरून नेल्याबाबत या दोघांविरूध्द सन २००८ मध्ये फौजदारी गुन्हा नोंदविला असून न्यायालयातही दावा दाखल आहे. त्यांनी कागदपत्रे चोरून नेली असल्यामुळे व त्याच संदर्भातील माहिती मागत असल्यामुळे माहिती देता येत नसल्याचे त्यांना कळविले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्रीराम विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, धोत्रे, पो.खामगाव, ता.बार्शी, जि.सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.सुनिल दादाराव जाधवर यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे पाहता विषय अंतर्गत वादाचा असून कागदपत्रांबाबतची नेमकी वस्तुस्थिती फौजदारी गुन्ह्याच्या / न्यायालयीन प्रक्रियेनंतर स्पष्ट होईल, असे दिसते. या स्थितीत अपीलकर्त्याची तक्रार मान्य करता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

पुणे
2 4 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नारायण मुरलीधर मोटे
मु.पाथुर्डी, पो.घोटी, ता.करमाळा, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
करमाळा, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, पाथर्डी विकास कार्यकारी
सेवा सहकारी संस्था मर्यादित, पाथर्डी, ता.करमाळा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०५१ /२००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नारायण मुरलीधर मोटे
मु.पाथुर्डी, पो.घोटी, ता.करमाळा, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
करमाळा, जि.सोलापूर श्री.व्ही.एस.जगदाळे

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, पाथर्डी विकास कार्यकारी
सेवा सहकारी संस्था मर्यादित, पाथर्डी, ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.एम.जी.दस्तगीर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.९.८.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१२.९.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०.१०.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१११.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

कर्ज माफ झालेल्या व न झालेल्या सभासदांची यादी, गट क्रमांक, क्षेत्र आदी नोंदी व ७/१२ उताऱ्यांसह माहिती आपण मागितली होती. सेवा सहकार संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करमाळा, जि.सोलापूर यांच्या आदेशानंतरही माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.नारायण मुरलीधर मोटे यानी केली. माहिती देण्यास विलंब झाल्यामुळे सचिवांवर योग्य ती कारवाई करावी व आपल्याला माहिती देईपर्यंत संस्थेचे सर्व व्यवहार बंद ठेवावेत, माहिती दिल्यानंतर व्यवहार चालू करावेत व आपल्या अर्जानुसार शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा दाखला देऊन प्रश्न सोडवावेत, अशी लेखी व तोंडी मागणी श्री.मोटे यांनी केली.

श्री.मोटे यांनी मागितलेली माहिती नाकारली नव्हती. संस्थेकडील उपलब्ध माहिती टपालाने पाठविली. ती त्यांनी घेतली नाही. संबंधित यादीत फक्त क्षेत्र नोंदविलेले असते, गट क्रमांक नसतात, त्यामुळे ते देता येणे शक्य नव्हते, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सचिव, पाथर्डी विकास कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित, पाथर्डी, ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.एम.जी.दस्तगीर यांनी केले.

कर्ज माफ झालेल्या शेतकऱ्यांचे ७/१२ उतारे संस्थेकडे नाहीत. तसेच कर्ज माफ झालेल्या सर्व शेतकऱ्यांचे दाखले, स्वाक्षरीसह यादी अशा स्वरूपाची इतर व्यक्तींची माहिती देता येणार नाही. इतर सर्व माहिती दिली आहे. आवश्यक असल्यास अभिलेख पाहून आणखी माहिती हवी असल्यास अपीलकर्ता ती प्राप्त करून घेऊ शकतात, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करमाळा, जि.सोलापूर श्री.व्ही.एस.जगदाळे यांनी केले.

अपीलकर्त्याने सरसकट स्वरूपाची व सर्व शेतकऱ्यांच्या संदर्भातील तपशिलाची मागणी केली आहे. इतर शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे दाखले,७/१२ उतारे अशा स्वरूपाची त्रयस्थ पक्षाची माहिती न देण्याचा जन माहिती अधिकाऱ्यांना निर्णय योग्य आहे. 'येथून पुढे वाटप होणाऱ्या सभासदाचे नाव, रक्कम, प्रत्येक महिन्याला आपल्याकडील रिपोर्ट मला पत्राने मिळावा. तो खर्च भरण्यास तयार आहे.' अशा स्वरूपाची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत 'माहिती' ठरत नाही. दरमहा अहवाल देण्यासारख्या स्वरूपाची मागणी करणे हा अपीलकर्त्याने लावलेला माहितीच्या अधिकाराचा अतिव्याप्त अर्थ आहे. आी मागणी करणे योग्य नाही. उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे अपीलकर्त्यास कर्जमाफीच्या याद्या, गटक्रमांक जन माहिती अधिकारी तथा सचिव, पाथर्डी विकास कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित, पाथर्डी, ता.करमाळा, जि.सोलापूर यांनी नमूद करून द्यावेत, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशाप्रमाणे दिलेल्या माहितीचा अहवाल आयोगाला आठ दिवसात सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
28 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय शिवाजी महाबोले
शुक्रवार पेठ, मु.पो.ता.माढा, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, शाखा माढा, ता.माढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०५२ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संजय शिवाजी महाबोले
शुक्रवार पेठ, मु.पो.ता.माढा, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर
प्राधिकृत अधिकारी श्री.त्रिं.ज.कुंभार

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, शाखा माढा, ता.माढा, जि.सोलापूर श्री.अ.द.खंडागळे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.९.९.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१५.९.२००९ व ३.११.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.५.११.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१७.१२.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मगितलेली माढा -को ऑप.सोसायटीच्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शाखा माढा, ता.माढा, जि.सोलापूर यांनी दिली नाही. प्रथम अपिलातही अद्यापपर्यंत कोणतीही माहिती मिळालेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.संजय शिवाजी महाबोले यांनी केली.

अपीलकर्त्यांनी मागणी केलेली माहिती संस्था स्तरावरील असल्यामुळे अर्ज संस्थेकडे वर्ग करून अपीलकर्त्यास तसे कळविले. श्री.महाबोले यांनी योग्य अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील न करता वरिष्ठांकडे अपील दाखल केले. दोन वेळा सुनावणीच्या तारखा देऊनही ते गैरहजर राहिले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनीही शुल्क भरण्यास कळवूनही श्री.महाबोले यांनी शुल्क न भरता राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शाखा माढा, ता.माढा, जि.सोलापूर श्री.अ.द.खंडागळे यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

शुल्क न भरता अपील करण्याची व त्याद्वारे सर्व यंत्रणांचा वेळ व कार्यशक्ती वाया घालविण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही, याची समज त्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आयोग

अपील अमान्य करण्यात येत आहे.

माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे

2 4 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्रीमती प्रतिभा नारायण पाटील
२, अनुपमा को-ऑप हौसिंग सोसायटी,
बॉडीगेट, औंध, पुणे-७

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
सहकारी संस्था, पुणे शहर (२),
पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
सहकारी संस्था, पुणे शहर (२),
पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०५२/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** संस्थेच्या सभासद व व्यवस्थापन समितीने सभासदांविरुध्द केलेल्या तक्रारी अर्जासंदर्भातील माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्रीमती प्रतिभा नारायण पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. तरीही राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२५/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. 'अपीलकर्त्यास कार्यालयात उपलब्ध असणारी माहिती देण्यात आलेली आहे. तथापि

आपल्या तक्रार अर्जावर कार्यवाही करावी, अशी अपीलकर्त्याची मूळ मागणी आहे. अपीलकर्त्याने मागणी केलेली माहिती ही जिल्हा उपनिबंधक यांच्या धारिकेवरुन प्राप्त करुन घेऊन त्याप्रमाणे आवश्यकतेनुसार कायदेशीर कारवाईबाबतचा निर्णय घेण्यात येईल', असे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (२), पुणे श्री. एम.पी.सोबले व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (२), पुणे श्री. सुनिल देशमुख यांनी प्रपत्रात नमूद केले. त्यानुसार कार्यवाही करुन अपीलकर्त्यास दि.५/११/२००९ रोजी कळविण्यात आल्याचे, त्या पत्राच्या प्रतीसह श्री. सोबले यांनी दि.११/११/२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.राजाराम खंडू व्हनखंडे
प्लॉट नं.१९अ, आप्पासाहेब पाटील नगर, १००फूटी रोड, सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यवाह, सांगली शिक्षण संस्था,
द्वारा सिटी हायस्कूल, गावभाग, सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, श्री.म.के.आठवले
विनय मंदिर, गणेश दुर्ग, राजवाडा परिसर, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०५५ / २००९ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राजाराम खंडू व्हनखंडे
प्लॉट नं.१९अ, आप्पासाहेब पाटील नगर, १००फूटी रोड, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यवाह, सांगली शिक्षण संस्था,
द्वारा सिटी हायस्कूल, गावभाग, सांगली श्री.एस.एस.देशपांडे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, श्री.म.के.आठवले विनय मंदिर,
गणेश दुर्ग, राजवाडा परिसर, सांगली सौ.एस.एस.जाधव

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१४.९.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१९.११.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१२.१०.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२४.११.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, श्री.म.के.आठवले विनय मंदिर, गणेश दुर्ग, राजवाडा परिसर, सांगली यांच्या जातवैधता प्रमाणपत्राबाबतची आपण मागितलेली माहिती अपुरी मिळाली. त्यांच्या जातवैधता प्रमाणपत्राची नक्कल दिलेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.राजाराम खंडू व्हनखंडे यांनी केली.

सांगली, मिरज व कुपवाड शहर महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या प्रशासन अधिकाऱ्यांकडे श्री.व्हनखंडे यांनी अर्ज केला होता. त्यांनी तो आपल्याकडे वर्ग केल्यानंतर माहिती दिली. आपला जातवैधता प्रमाणपत्राचा प्रस्ताव सादर केल्याची प्रत अपीलकर्त्यास दिली आहे. प्रमाणपत्र अद्याप मिळालेले नाही व कोणतीही माहिती लपविलेली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा कार्यवाह, सांगली शिक्षण संस्था, द्वारा सिटी हायस्कूल, गावभाग, सांगली यांच्या सूचनेनुसार तासिकांबाबतची चूक दुरूस्त करून अतिरिक्त माहितीही पुरविली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, श्री.म.के.आठवले विनय मंदिर, गणेश दुर्ग, राजवाडा परिसर, सांगली सौ.एस.एस.जाधव यांनी केले. अपिलीय प्राधिकारी तथा कार्यवाह, सांगली शिक्षण संस्था, द्वारा सिटी हायस्कूल, गावभाग, सांगली श्री.एस.एस.देशपांडे यांनी त्याला दुजोरा दिला.

पात्रता नसताना नियमबाह्य पध्दतीने श्रीमती जाधव यांची नियुक्ती झाल्याचा आक्षेप श्री.व्हनखंडे यांनी नोंदविला. तथापि ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची नाही. सौ.जाधव यांना जातवैधता प्रमाणपत्र मिळाल्यानंतर त्याची प्रत श्री.व्हनखंडे यांना पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार आपल्याला

दि.२०.४.२०१० रोजी प्रमाणपत्र प्राप्त झाले व त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरविली, असे संदर्भित प्रमाणपत्राच्या प्रतीसह मुख्याध्यापिका सौ.एस.एस.जाधव यांनी दि.२३.४.२०१० च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
2 4 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रकाश विनायक पवार
२५१ / क, शनिवार पेठ, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, भूसंपादन व व्यवस्थापन,
भूमी जिंदगी कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
भूमी जिंदगी कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०५६ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रकाश विनायक पवार
२५१ / क, शनिवार पेठ, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, भूसंपादन व व्यवस्थापन,
भूमी जिंदगी कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.सुधाकर तेलंग

| | | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,<br>भूमी जिंदगी कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.साहेबराव दांडगे | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.४.९.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.१०.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१६.१०.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.९.११.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

मराठा भांडीवाले सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या संदर्भात मागितलेली माहिती अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, भूसपांदन व व्यवस्थापन, भूमी जिंदगी कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्या आदेशनंतरही पूर्ण दिली गेली नाही. विस्थापितांचे अर्ज मागविण्याबाबत ठराव झाला होता. परंतु ते मागविले नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.प्रकाश विनायक पवार यांनी केली.

अपीलकर्ता श्री.पवार सातत्याने याच संस्थेसंदर्भात त्याच त्याच स्वरूपाचे अर्ज करीत असतात. आतापर्यंत १५ ते २० अर्ज त्यांनी केले असून त्या त्या वेळी त्यांना माहिती देण्यात आली आहे. तसेच प्रत्येक वेळी सर्व संचिका अवलोकनासाठी उपलब्ध करून दिली जाते, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, भूमी जिंदगी कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.साहेबराव दांडगे यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

अपीलकर्ता एकाच विषयाबाबत सातत्याने अर्ज करीत असून प्रामुख्याने प्रशासकीय कार्यवाहीबाबतच्या तक्रारींचा व आक्षेपांचा त्यात समावेश आहे. संबंधित सर्व संचिकांचे

अवलोकन करून आवश्यक माहिती त्यांनी प्राप्त करून घ्यावी. पुन:पुन्हा याच स्वरूपाचे अर्ज व अपिले करून सर्व यंत्रणांचा वेळ व कार्यशक्ती यांचा अपव्यय करू नये, अशी समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
2 8 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. निळकंठ सहदेव गोरडे
सी-५/७६, शांतीरक्षक सोसायटी, येरवडा, पुणे-६ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक कामगार आयुक्त, — उत्तरवादी
कामगार उप आयुक्त यांचे कार्यालय,
पुणे-मुंबई-रोड, शिवाजीनगर, पुणे-५

**जन माहिती अधिकारी** तथा सरकारी कामगार अधिकारी,
कामगार उप आयुक्त यांचे कार्यालय,
पुणे-मुंबई-रोड, शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०५९ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ७.४.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता -** श्री. निळकंठ सहदेव गोरडे<br>सी-५/७६, शांतीरक्षक सोसायटी, येरवडा, पुणे-६<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक कामगार आयुक्त,<br>कामगार उप आयुक्त यांचे कार्यालय,<br>पुणे-मुंबई-रोड, शिवाजीनगर, पुणे-५<br>श्री. बा. व. वाघ<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सरकारी कामगार अधिकारी,पुणे<br>कामगार उप आयुक्त यांचे कार्यालय,<br>पुणे-मुंबई-रोड, शिवाजीनगर, पुणे-५ श्री. दि. ता. पाटील | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.८.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.९.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.४.२०१० |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

एलिक्झीर ट्रेनिंग सर्व्हिसेस प्रा. लि., पुणे या कंपनीत नोकरीबाबत आपल्यावर सतत अन्याय होत असून त्या अनुषंगाने आपण मागितलेली माहिती उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, पुणे यांनी कळविले. अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त, पुणे आपला प्रश्न सोडवतील, अशा अपेक्षेने आपण अपील मागे घेत असल्याचे लिहून दिले, परंतु प्रश्न सुटलेला नाही. संबंधित कंपनी कामगार आयुक्त कार्यालयाच्या नियंत्रणाखाली असल्यामुळे त्यांच्याकडून घेऊन माहिती दिली पाहिजे, अशी मागणी अपीलकर्ता श्री. निळकंठ सहदेव गोरडे यांनी केली.

अपीलकर्त्याने मागितलेली माहिती खाजगी कंपनीकडील आहे, ती आपल्या कार्यालयाकडे उपलब्ध नसते. ही कंपनी पूर्णपणे खाजगी असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही, त्यामुळे माहिती देता येत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, पुणे श्री. दि. ता. पाटील यांनी केले.

श्री. गोरडे यांनी सुनावणीला हजर न राहता, अपील मागे घेत असल्याचे पत्र दिले. प्रश्न सोडविण्याचा त्याच्याशी संबंध नाही. संबंधित कंपनीबाबत अधिकाऱ्यांनी तपासणी केलेली नसल्यामुळे त्याचा अहवाल देणे शक्य नव्हते, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त, पुणे श्री. बा. व. वाघ यांनी केले.

जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त, पुणे यांचे निवेदन लक्षात घेता संबंधित माहिती खाजगी कंपनीकडील असून कामगार उपआयुक्त कार्यालयाने ती मिळवून द्यावी, असे बंधन घालता येणार नाही. कामगार उपआयुक्त कार्यालयाकडे कायद्यानुसार प्राप्त होणारी माहिती जन माहिती अधिकारी देऊ शकतात.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. निळकंठ सहदेव गोरडे
सी-५/७६, शांतीरक्षक सोसायटी, येरवडा, पुणे-६ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक कामगार आयुक्त, — उत्तरवादी
कामगार उप आयुक्त यांचे कार्यालय,
पुणे-मुंबई-रोड, शिवाजीनगर, पुणे-५

**जन माहिती अधिकारी** तथा सरकारी कामगार अधिकारी,
कामगार उप आयुक्त यांचे कार्यालय,
पुणे-मुंबई-रोड, शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०५९ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ७.४.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता -** श्री. निळकंठ सहदेव गोरडे<br>सी-५/७६, शांतीरक्षक सोसायटी, येरवडा, पुणे-६<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक कामगार आयुक्त,<br>कामगार उप आयुक्त यांचे कार्यालय,<br>पुणे-मुंबई-रोड, शिवाजीनगर, पुणे-५<br>श्री. बा. व. वाघ<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सरकारी कामगार अधिकारी,पुणे<br>कामगार उप आयुक्त यांचे कार्यालय,<br>पुणे-मुंबई-रोड, शिवाजीनगर, पुणे-५ श्री. दि. ता. पाटील | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.८.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.९.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.४.२०१० |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

एलिक्झीर ट्रेनिंग सर्व्हिसेस प्रा. लि., पुणे या कंपनीत नोकरीबाबत आपल्यावर सतत अन्याय होत असून त्या अनुषंगाने आपण मागितलेली माहिती उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, पुणे यांनी कळविले. अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त, पुणे आपला प्रश्न सोडवतील, अशा अपेक्षेने आपण अपील मागे घेत असल्याचे लिहून दिले, परंतु प्रश्न सुटलेला नाही. संबंधित कंपनी कामगार आयुक्त कार्यालयाच्या नियंत्रणाखाली असल्यामुळे त्यांच्याकडून घेऊन माहिती दिली पाहिजे, अशी मागणी अपीलकर्ता श्री. निळकंठ सहदेव गोरडे यांनी केली.

अपीलकर्त्याने मागितलेली माहिती खाजगी कंपनीकडील आहे, ती आपल्या कार्यालयाकडे उपलब्ध नसते. ही कंपनी पूर्णपणे खाजगी असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही, त्यामुळे माहिती देता येत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, पुणे श्री. दि. ता. पाटील यांनी केले.

श्री. गोरडे यांनी सुनावणीला हजर न राहता, अपील मागे घेत असल्याचे पत्र दिले. प्रश्न सोडविण्याचा त्याच्याशी संबंध नाही. संबंधित कंपनीबाबत अधिकाऱ्यांनी तपासणी केलेली नसल्यामुळे त्याचा अहवाल देणे शक्य नव्हते, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त, पुणे श्री. बा. व. वाघ यांनी केले.

जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त, पुणे यांचे निवेदन लक्षात घेता संबंधित माहिती खाजगी कंपनीकडील असून कामगार उपआयुक्त कार्यालयाने ती मिळवून द्यावी, असे बंधन घालता येणार नाही. कामगार उपआयुक्त कार्यालयाकडे कायद्यानुसार प्राप्त होणारी माहिती जन माहिती अधिकारी देऊ शकतात.

मात्र मुद्दा क्र.४ नुसार अपीलकर्त्याच्या भविष्य निर्वाह निधी संबंधीच्या माहितीसाठी अर्ज भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे वर्ग करावा, व संदर्भित माहिती देण्याबाबत त्या कार्यालयाच्या जन माहिती अधिकाऱ्यांना कळवावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अर्ज जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, पुणे यांच्याकडे पाठविल्याचे जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, पुणे यांनी दि. ८.४.२०१० च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

पुणे
दि. 31 MAY 2010

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संदीप मोहनराव यादव
४६९ बी/३, शनिवार पेठ, मोहिते हॉस्पीटलशेजारी,
फेडरल बँकेच्यावर, कराड, ता.कराड, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा शल्य चिकित्सक,
सामान्य जिल्हा रूग्णालय, सातारा, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा वैद्यकीय अधीक्षक,
उपजिल्हा रूग्णालय, कराड, ता.कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०६६ / २००९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संदीप मोहनराव यादव
४६९ बी/३, शनिवार पेठ, मोहिते हॉस्पीटलशेजारी,
फेडरल बँकेच्यावर, कराड, ता.कराड, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा शल्य चिकित्सक,
सामान्य जिल्हा रूग्णालय, सातारा, जि.सातारा प्रतिनिधी डॉ.श्रीमती बी.के.दळवी

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा वैद्यकीय अधीक्षक,<br>उपजिल्हा रूग्णालय, कराड, ता.कराड, जि.सातारा डॉ.व्ही.डी.सवाखंडे | | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३१.७.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.७.९.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१८.९.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

नागरी हिताच्या दृष्टीने कराड शहरातील पॅथॉलॉजी लॅबोरेटरीजबाबतची माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रूग्णालय, कराड, ता.कराड, जि.सातारा यांनी अपुरी दिली. अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य जिल्हा रूग्णालय, सातारा, जि.सातारा यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. माहिती परिपूर्ण मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता डॉ.संदीप मोहनराव यादव यानी केली.

तत्कालीन वैद्यकीय अधिकारी डॉ.मोहन यशवंत पाटील हे सध्या निलंबित आहेत. डॉ.यादव यांच्या मागणीनुसाार अभिलेखात माहिती नसते. परंतु ती संकलित करून दिली आहे. त्यात आणखी तपशील हवा असल्यास प्रत्यक्ष पाहणी करून आठ दिवसांत माहिती देण्यात येईल, असे निवेदन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रूग्णालय, कराड, ता.कराड, जि.सातारा डॉ.व्ही.डी.सवाखंडे यांनी केले. माहिती संकलित करून देण्याची त्यांची भूमिका उल्लेखनीय आहे. त्यांच्या निवेदनानुसार आठ दिवसांत परिपूर्ण माहिती अपीलकर्त्यास पुरविण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) सुनावणीच्या वेळी दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रूग्णालय, कराड, ता.कराड, जि.सातारा डॉ.व्ही.डी.सवाखंडे यांनी दि.५.६.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**20 MAY 2010**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. नामदेव शामराव नालंदे
वकील कॉलनी,
ता.बारामती, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी,**
ता.बारामती, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,**
सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २११२/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२/०२/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९/०३/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८/०४/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३/०४/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन १९९५ ते २००७ या कालावधीत करण्यात आलेल्या सिमेंट नालाबंडींग कामाची माहिती | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१६/१२/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्ता श्री. नामदेव शामराव नालंदे यांच्या मूळ माहिती अर्जातील माहितीसाठी रु.९२८८/- एवढे शुल्क जमा करण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, सासवड यांनी कळविले होते. तसेच अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, बारामती यांनी अपीलकर्त्याचे प्रथम अपील फेटाळले व माहितीसाठीचे

शुल्क भरावे, असा निर्णय दिलेला आहे. ही वस्तुस्थिती संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केलेली आहे. अपीलकर्त्यास माहिती आवश्यक तर शुल्क भरुन प्राप्त करुन घेता येईल.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 28 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. नामदेव शामराव नालंदे
व्हील कॉलनी, बारामती,
जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**
बारामती नगर परिषद,
जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपमुख्याधिकारी,**
बारामती नगर परिषद,
जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २११३/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०/०३/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८/०४/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८/०५/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५/१२/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री.भंडारे बंधु यांच्या रसराज रसवंती गृहाच्या जागेबाबत, नळकनेक्शन साईज, घरपट्टी, आरोग्य विभागाने दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राची प्रत इ. माहिती | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१६/१२/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता.

अपीलकर्ता श्री. नामदेव शामराव नालंदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे लक्षात घेता जन माहिती अधिकारी उपमुख्याधिकारी, बारामती नगर परिषद, जि.पुणे यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, बारामती नगर परिषद, यांनी दिलेला निर्णय योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 28 MAY 2010